# आत्मज्ञान, विज्ञान व वाणी ह्या जगाला घडविणाऱ्या तीन शक्ति

साम्ययोग : दैनिक पुरवणी

# विनोबा-वार्ता

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : ५०] सेवाग्राम, मगळवार ता. ५ मे १९६४ [मूल्य ५ न. पै.

## पत्रकारांचे महत्व मान्य पण पत्रांची प्रतिष्ठा वाढवा

आचार्य विनोबांची पदयात्रा ज्या जिल्हयात चालू आहे त्याच्या शेजारी असलेल्या चांदा जिल्हयात चंद्रपूर येथे चालू आठवड्यात महाराष्ट्रातील मराठी वृत्तपत्रकारांचे वार्षिक अधिवेशन झाले. जवळच विनोबाजींच्या पदयात्रेचा पडाव आहे ही बातमी समजल्यामुळे अधिवेशन संपल्यावर विनोबाजींना भेटण्याची इच्छा पत्रकारांनी व्यक्त केली या इच्छेस अनुसरून सोमवार ता. २७ हा भेटीचा दिवस निश्चित झाला. या दिवशी देवळी विभागात वाटखेडे या खेडेगावी विनोबांचा मुक्काम होता. विश्वातील एका महापुरुषाला दूर अशा एका खेड्यात जाऊन भेटण्याच्या कल्पनेमुळे पत्रकारांच्या मनात विशेष कुतूहल निर्माण झाले होते.

### खेड्यात पत्रकारांचे स्वागत

ता. २७ रोजी दुपारी ४ वाजता सुमारे १०० पत्रकारांचे वाटखेडे गावात आगमन झाले. पदयात्रेच्या सभामंडपात ग्रामस्थानी व पदयात्रेतील सर्वोदय सेवकांनी पत्रकारांचे सहर्ष स्वागत केले विनोबांच्या ग्रामदान कार्याची माहिती देणारी पत्रके, विनोबा–वार्ता या दैनिकाचे अंक व अन्य काही पुस्तिका पत्रकारांना देण्यात आल्या.

पत्रकारांच्या आगमनानंतर ५ मिनीटांनी विनोबा आपल्या निवासातून सभास्थानी आले. सानेगुरुजींच्या साधना साप्ताहिकाचे संपादक श्री यदुनाथ थत्ते यांनी पत्रकारातर्फे भाषण करून पत्र-कारासाठी भाषण करण्याची विनोबांना विनंती केली. विनोबांचे सुमारे पाऊण तास चाललेले भाषण पत्रकारांनी बाहेर उन्हाळयाचा त्रास असून देखील अत्यंत एकाग्रतेने ऐकले. विनोबा म्हणाले–

"मी माजी पत्रकार होतो. तेव्हा आपल्यासमोर माजी पत्रकार म्हणून बोलावे, की माणूस म्हणून बोलावे, की दोन्ही भूमिकेवरून बोलावे असा विचार करीत आहे. सुरवातीला 'महा-राष्ट्र-धर्म' हे मासिक मी सुरू केले. पुढे त्याचे पाक्षिक झाले. वर्तमानत्र चालविण्याचा थोडासा अनुभव मिळाला. त्याच्या आधारावर मी काही बोलावे यात काही सार नाही. आता सबंध पृथ्वीवरून बातम्या येत असतात आणि पत्रकार ब्रम्हदेवाच्या चतुर्मुख जातीचे असतात. चारही बाजूला पाहून आणि त्याबद्दल सारासार विचार करून त्यांना लिहावे लागते. यापुढे पृथ्वीहि अपुरी ठरेल. ह्यापुढे मंगल, चंद्र इत्यादिकावर बातमीदार पाठवून त्यावर मतप्रदर्शित करावे लागेल. त्या दृष्टीने चाळीस वर्षा-पूर्वीचे जुने अनुभव ते मी काय सांगणार ?

अणुयुग आल्यावर तत्पुर्वीची राज-नीति, सायन्स निरूपयोगी झाले. व सगळे समाजशास्त्र व धर्मपंथाचे विचार मागासले. व तेव्हा जिवनासबंधी अगदी नव्यानेच विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### तीनशक्ति आत्मज्ञान, विज्ञान व वाणी

तेव्हा जुना पत्रकार या नात्याने मी बोलू शकत नाही तर नव्या युगाचा माणूस या नात्याने मी माझे विचार मांडत आहे. माणूस हजारो वर्षा-पासून सारखा बदलतो आहे. विज्ञानाच्या व आध्यात्मिक शोधाने बदलतो आहे. आत्मज्ञानाचा प्रभाव आंतरिक जिवनावर पडतो व विज्ञानाचा प्रभाव बाह्य जिव-नावर पडतो. आणि अध्यात्म व विज्ञान ह्या दोहोंचा परस्परावर परिणाम होत असतो. विज्ञानाचे जिवनावर बाह्य परिणाम तर होतातच शिवाय आंतरिक जिवनावरही त्याचा प्रभाव पडतो. तसेच आध्यात्मिक शोधांचा आंतरिक जीवनावर प्रभाव तर पडतोच शिवाय बाह्य जिवनावरही त्याचे परिणाम होतात. आत्मज्ञान आणि विज्ञान ह्या जिवनावर परिणाम करणाऱ्या दोन मुख्य शक्ति आहेत व या दोन शक्तींना जोडणारी साहित्य ही तिसरी शक्ति आहे. आणि साहित्यात पत्रांचाहि समा-वेश होतो. पत्रकार हा त्या दालनाचा एक भाग आहे. म्हणून त्याचे महत्व पुष्कळ मोठे आहे. लोक त्यांना पंचमस्तंभ या नांवाने ओळखतात.

आध्यात्म, विज्ञान व वाणी ही जिवनाची प्रस्थानत्रयी आहेत. वाणीत पत्रकार, साहित्यिक व शिक्षक येतात. त्या प्रस्थानत्रयीपैकी एक; व या तिवयीपैकी एक पाय म्हणून पत्रकाराची प्रतिष्ठा माझ्या दृष्टीने मोठी आहे. व विज्ञान युगात ती वाढणार आहे. पत्र-कारांच्या हे लक्षात यावयास पाहिजे. जनरुचिनुसार बातम्या देणे हे वर्तमान-पत्राचे एक अल्पसे अंग आहे. भावी समाजासाठी योग्य ती भावना, योग्य अशी दृष्टि समाजात निर्माण करणे हे त्यांचे मुख्य कार्य आहे.

### विज्ञान आधुनिकतम लागते व आत्मज्ञानाची कसोटी त्याच्या प्राचीनतेवरून होते

वर्तमानकाळ क्षणिक असतो, भूत-काळ तर कालजमा झालेला असतो आणि समोर विशाल भविष्यकाळ उभा असतो. भविष्यात पुरुषार्थ गाजवायचा असतो. त्यासाठी जनतेला तयार करायचे असते. लोकांना आज जे चालले आहे ते सांगायचे व भविष्याकडे घेऊन जायचे हे दुहेरी काम पत्रकारांचे आहे. पत्र-कारांचा धाक समाजाला राखावा लागणार हे जाणून पत्रकाराने प्रतिष्ठित असावे आज पत्रकारांची प्रतिष्ठा अमान्य नाही पण पत्रांची प्रतिष्ठा नाही. कालचे वर्तमान पत्र आज चालत नाही. या उलट आध्यात्मिक साहित्याचे आहे. ते जितके जुने तितके अधिक मोलाचे वाटते. कारण ते काळाच्या कसोटीला उतरलेले असते. आध्यात्मात विज्ञानाप्रमाणे बाह्य प्रमाणे देता येत नाहीत, श्रद्धेने मान्य करावे लागते. म्हणून काळावरून त्याची परीक्षा ठरते.

ग्रंथ जितके प्राचीन तितके आदरणीय ठरतात. आणि विज्ञान आधुनिकतम लागते. ह्या दोहोंना जोडणे हे साहि-त्यिकांचे काम.

### राजनीति समाजाचे झिजते अंग

तेव्हा पत्रांची प्रतिष्ठा वाढत जाईल व आजचे वर्तमानपत्र उद्याहि कसे उप-योगी ठरेल हे त्यांनी पहावे. समाजाला राजनीतीचे प्रश्न जे आज महत्वाचे वाटतात त्यांचे उद्या महत्व राहत नाही. दुसऱ्या दिवशी लोकांचे लक्ष दुसऱ्या बातमीवर जाते. म्हणून क्षणिक चाल-णाऱ्या राजनीतीला जास्त महत्व देऊ नये. आजच्या साठी राजनीतीचे अंग महत्वाचे असेल पण त्याला अतिमहत्व देऊ नये. राजकारण हे समाजाचे वाढते अंग नाही. झिजते अंग आहे. जोपर्यंत समाज आपले स्वत्व ओळखत नाही व आपल्या जिव-नाचे सूत्र लंडन, दिल्लीवर सोपवितो तेव्हा तेथल्या पुढाऱ्याच्या बोलण्याला, वागण्याला अवास्तव महत्व येते. वर्तमान पत्रात त्यांचेवर रकानेच्या रकाने भरून येतात 'मिनिस्टरने दाळीचा कारखाना उघडला.' तसे पाहीले तर या बातमीला काही महत्व नाही. पण कारखानदाराचा जोर व मिनिस्टरचा जोर यामुळे त्या बातमीला महत्व येते. 'चार शेर गांजा सापडला.' अशा क्षणिक बातम्या देत जाणे आणि त्याचे महत्व वाढविणे हे आपल्या पत्राचे महत्व कमी करणारे होईल. म्हणून पत्रकारांनी लोक जीवनाच्या दृष्टीने घटनाकडे पहावे व त्यांना प्रतिबिंबित करावे. राजकारण्यांचे जिवन हे मालवणाऱ्या दिव्याच्या उजेडाप्रमाणे आहे. विज्ञान युगात राजनीति इतकी क्षीण होईल की ती उरणारच नाही.

राजनीति तकलादी आहे. व जे राजनीति चालवितात तेही जाणतात की आपल्या हाती काही नाही. हिंदुस्थान सरकार आपले बजेट बनविते ही गोष्ट खरी आहे कां ? पाकिस्तानचे बजेट चीनकडे पाहून बनते. रशियाचे बजेट अमेरिका व अमेरिकेचे बजेट रशिया बनवितो म्हणजे ज्याला स्वातंत्र्य म्हणतात ते कोठे नाही.

### युद्ध ही कालबाह्य घटना

क्युबा प्रश्नाचे वेळी महायुद्धाचा भडका उडणार होता. रूश्चोवला सद्बुद्धि सुचली नसती व त्याने माघार घेतली नसती तर अर्ध्या जगाचा संहार झाला असता. चीनने त्याला भित्रा म्हटले. रूश्चोवने उत्तर दिले शहाण्याने युद्धास अवश्य म्यावे. कोणासाठी लढाई करायची ? देशासाठी ! देश म्हणजे काय डोंगर पत्थर आहेत ? ज्यांच्यासाठी लढाई करायची ज्या मुलाबाळासाठी लढाई करायची तो भेद या लढाईत चालत नाही. रोगी-निरोगी, स्त्री पुरूष, तरूण, लढणारे-बिनलढणारे, ह्या सर्वांशी तो वरून पडणारा बॉम्ब समत्व बुद्धीने वागतो. अगदी सर्वत्र सपाट, साम्ययोगी. म्हणजे ज्यांच्यासाठी लढावे ते ही जर शिल्लक राहत नाहीत व तेही मरू लागले तर लढण्याला अर्थच उरत नाही.

तेव्हा युद्ध, राजनीति व राष्ट्राचे रूप आता पूर्ण बदलले आहे. पूर्वी जाट विरूद्ध राजपूत, मराठी विरूद्ध कानडी अशा सेना लढत असत. आता बेळगावच्या प्रश्ना वरून महाराष्ट्र व कर्नाटक या सेना एकमेकाशी भिडतात कां ? आपण सेना राखण्याचा अधिकार दिल्लीला दिला म्हणून भारत बनला.

### राष्ट्राचे स्वातंत्र्याचा संकोच करून विश्वराज्याला अधिकार द्यावे लागणार

आपण अखिल भारतीयत्व बलवान करण्यासाठी स्वातंत्र्य मर्यादित केले.

www.vinoba.in

आमचे राष्ट्रपति राधाकृष्णन् थोर चिंतक व तत्वज्ञ आहेत. ते म्हणतात "विश्वराज्यासाठी प्रत्येकाने आपल्या स्वातंत्र्याचा काही अंश समर्पण करण्याची तयारी दाखविली तरच विश्वशांति होईल." म्हणजे स्वतंत्रतेला स्वतंत्र किंमत उरली नाही. स्वातंत्र्याला ॲब्सुल्युट मूल्य नाही. परस्परावलंबी समाज बनेल. जरूरी स्वातंत्र्य व बिन जरूरी स्वातंत्र्य असे दोन विभाग पडतील. स्वातंत्र्य म्हणजे जरूरी असे नाही. काही जरूरी तर काही बिन जरूरी सायन्स जसजसे व्यापक होईल तसतसे परस्परावलंबन वाढेल. गीतेत 'परस्पर भावयंतः' परस्परांचे भावन करा हा मोठा आध्यात्मिक विचार मांडला आहे. आणि आता विज्ञानाने त्याला अधिक महत्व आले आहे.

आज राजनीति जोर मारते. जसा न पोहणारा नदीत पडला तर तडफडतो परंतु हा तडफडणारा सक्रियतापूर्वक निष्क्रीय होणार. तसे राजनीतीचे जोरदार प्रदर्शन चालले आहे. माझ्यासारख्या जोडण्याचे काम करणाऱ्याला सुद्धा लोक विचारतात, शेख अब्दुल्लाच कसे ? तो त्यांच्या डोक्यावर बसला आहे. बाबाच्या नाही. मरणापूर्वी तीव्र हालचाल करणाऱ्या राजनीतीची तडफड चालली आहे. पण ती मरून चुकली आहे. राजनीति भूतकाळात जमा झाली आहे. विज्ञान, अध्यात्म व साहित्य शक्ति राहणार हे भविष्याचे चित्र आहे.

### पत्रकार भविष्याचे दृष्टे

वर्तमानला अगदीच विसरता येणार नाही. तुम्ही तर वर्तमान पत्रकार आहात भविष्यकार नाही. तेव्हा तुम्हाला ना भूतकाळ ना भविष्यकाळ. पण ह्या वर्तमान काळाबरोबर भविष्याची चिंता करा. भविष्यात टिकणाऱ्या कामाला महत्व द्या. आता नुकतीच रविंद्रनाथ टागोरांची जन्मशताब्दी झाली. युरोपातल्या प्रत्येक भाषेत त्यांच्या काही ग्रंथांचे भाषांतर झाले आहे. कारण त्यांच्या भाषेत मानवता निखळ प्रगट होते. अंश नाही. सबंध विश्वाला गोवणारी व्यापक दृष्टि त्यांची आहे. आपल्यातील जी मोठ्यात मोठी माणसे झाली व ज्यांचे चिंतनाचे क्षेत्र छोटे होते त्यांचे साहित्य दुसऱ्या भाषेत भाषांतरीत झालेच नाही पण आपल्या भाषेतही केवळ त्यांच्या लायब्ररी एडीशन उरल्या आहेत. गेल्या शंभर वर्षात ज्याने राजनीतीच्या क्षेत्रात थोर कामें केली आणि त्या स्वातंत्र्य भक्तात आध्यात्मिक भावना होती म्हणून अजून त्यांची काही नांवे दिसतात. पण विचार करा शंभर वर्षानंतर लोकमान्य व अरविंदाचे कोणते साहित्य वाचले जाईल ? गीतारहस्यातील टिकाऊ मूल्य टिकणार व व्यापक दृष्टि टिकणार. मी पाकिस्थानात गेलो होतो. भारतातल्या मोठ्यातल्या मोठ्या पुढाऱ्यांची गणना तेथे रि-ॲक्शनरी लोकात करण्यात येते. विवेकानंदाची सुद्धा. पण रविंद्रांचा मात्र तेथे गौरव आहे. म्हणून तुम्ही क्षणिक राजनीतीला टाळू शकत नसले तरी तिला अतिमहत्व देऊ नका. व भविष्यात येणाऱ्या मूल्यांना महत्व द्या. तरच तुमच्या पत्रांना महत्व येईल. तुमचे महत्व तर आहेच."

"दुसरे असे, आता तेरा वर्षानंतर महाराष्ट्रात माझा थोडा वेळ जाणार. त्यावेळी आलो होतो तेव्हा काश्मिरच्या वाटेवर होतो. आता सावकाशीने आलो तेव्हा तुमचे साह्य मला पाहिजे आहे. तुम्ही साधक-बाधक टीका कराव्यात पण लक्षात ठेवायला हवे की, मी एक क्रांतिकारी विचार घेऊन फिरतो किरकोळ दोष कोठे असतीलही पण विचार आद्यतन आहे."

### ग्रामदान महात्म्य

त्यानंतर विनोबांनी ग्रामदाना मागील विचार, त्याला पुढाऱ्यांनी दिलेली मान्यता, राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने त्याचे महत्व, चीनच्या वैचारीक आक्रमणाला तोंड देण्याची त्याची शक्ति, तसेच सरकारला खेड्याबाबत चिंतामुक्त करण्याची त्याची क्षमता, त्यामागील ग्रामस्वराज्याचा संकल्प, जमिनीची मालकी गावाची केल्याने शेतकऱ्यांच्या हातात नहमीसाठी राहण्याची शाश्वति, दारिद्र्य बेकारी त्याने कशी दुर होऊ शकते, आणि बंगालात या कामाला मिळालेले यश इत्यादि विविध गोष्टीवर विनोबांनी प्रकाश पाडला. नंतर ते पत्रकारासमोर बोलतांना म्हणाले, "बंगालमध्ये ग्रामदानाने फार सुंदर मोर्चा बांधला आहे. ह्या दृष्टीने याचा विचार करा देशाने जसे स्वराज्य मिळवले तसे गावानेही मिळवायचे आहे हे ध्यानात घ्या. सामाजिक शांतिमय क्रांति या आंदोलनात भरली आहे. तमाम राजनैतिक कार्यापेक्षा हे कार्य महत्वाचे आहे हे नेत्यांनी ही मान्य केले आहे.

### स्वातंत्र्य व समर्पण हे दोन पंख

भुवनेश्वर मध्ये लोकशाही समाजवादाचा प्रस्ताव पास झाला त्यामुळे तटस्थतेच्या धोरणाला विधायक अर्थ प्राप्त झाला. नाहीतर त्याचा अर्थ असंपृष्ट असा होता. आज जगात लोकशाही राष्ट्राजवळ समाजवाद नाही. व समाजवादी देशात लोकशाही नाही. तेव्हा दोहोंचे गुण घेऊन व दोष टाळून लोकशाही समाजवादाचा विचार आम्ही डोळ्यासमोर ठेवला आहे. आणि बहुतेक पक्षांना तो मान्य ही आहे. स्वतंत्र पक्षाच्या लोकाशी बोलण्याचा एक वेळ प्रसंग आला. मी त्यांना सांगितले हा पक्षी दोन्ही पंखांनी उडणारा आहे. तुमचे व्यक्ति स्वातंत्र्य मला मान्य आहे. व्यक्तीचे स्वातंत्र्य हा या पक्षाचा एक पंख व व्यक्तीचे समाजासमोर समर्पण हा दुसरा पंख आज एकीकडे हिसकावून घेणारा एक पक्ष आहे आणि एकीकडे घट्ट पकडून ठेवणारांचा पक्ष आहे. स्वतंत्रता व समर्पण म्हणजे स्वातंत्र इच्छापूर्वक समर्पण म्हणजेच भगवद्गीता.

भगवद्गीतेत कृष्णाने अर्जूनाला 'यथेच्छ तथा कुरू' म्हणून स्वातंत्र्यहि दिले. व तुला स्वतंत्र इच्छाच होऊ देऊ नकोस असेहि सांगितले. म्हणजे स्वतंत्रपणाने समर्पण करण्याची अक्कल आली पाहिजे. म्हणून मी दानाच्या पक्षाचा आहे. ह्यात स्वतंत्रपणे समर्पण आहे.

भुवनेश्वरच्या प्रस्तावाची शोभा व्हावयाची नसेल तर तुम्ही चिंतन मनन करा. मी महाराष्ट्रात आलो आहे. मी महाराष्ट्र प्रवेशाच्या प्रारंभीच सांगितले होते की मला ग्रह नाही व माझा आग्रह नाही. मी पक्षांना ओळखत नाही. व्यक्तीला ओळखतो.

सर्वांवर प्रेम करावे, त्यांच्या विचारांचा समान अंश घेऊन त्यांचा समन्मय करावा हे माझे काम आहे."

---

# कस्तूरबा कन्याश्रम माधान, जि. अमरावती

माधान येथे कस्तूरबाट्रस्ट संचालित एक मुलींचे छात्रालय चालू आहे. छात्रालयातील मुलींना चांगले संस्कार मिळावे व स्वयंपाक, सफाईची कामे स्वावलंबन इत्यादि कौटुंबिक जीवनाची कामे करता यावीत या दृष्टीने आमचा प्रयत्न असतो. शेती व बागायती कामांना येथे विशेष प्राधान्य दिले जाते.

छात्रालयात कोणत्याहि जातीच्या व धर्माच्या मुलींना प्रवेश मिळू शकेल.

ज्या गांवी किंवा आसपासच्या ४ मैलांच्या टापूत त्या मुली शिकत असलेला वर्ग नसेल अशा गावच्या हरिजन व मागासलेल्या जमातीच्या मुलींना सरकार कडून भोजन खर्चाची सवलत मिळते. व्यवस्थाखर्च व इतर खर्च स्वतः करावा लागेल बाकी इतर मुलींना मासिक भोजनखर्च रू. २० व व्यवस्थाखर्च रू. २ असा एकूण रू २२ खर्च येईल.

वर्ग ५ ते १० पर्यंतच्या मुलींना प्रवेश दिला जाईल. वर्ग ८, ९, व १० च्या प्रवेशाला खास प्राधान्य दिले जाईल. एकूण ४० मुलींची जागा आहे. अर्जाची शेवटची तारीख १५ मे आहे. प्रवेश देताना मुलींच्या अभ्यासातील प्रगतीचा विचार केला जाईल. खालील पत्त्यावर टपालखर्च पाठवून प्रवेश अर्ज मागवून घ्यावा.

मालिनी मशरूवाला
संचालिका
कस्तूरबा कन्याश्रम, माधान,
जि. अमरावती.

★

---

# डकेती क्षेत्रातील चमत्कार

डाकूंच्या क्षेत्रात सर्वोदयी कार्यकर्ते एकसारखा प्रचार करीत आहेत. त्या प्रचाराचा परिणाम फार चांगला झाला आहे. ते आता विश्वासपूर्वक असे म्हणतात की, प्रेम आणि सद्भावनेनी लोकांना समजाविले तर त्यांना हिंसेचा रस्ता सोडणे काही कठीण नाही.

गोष्ट अशी झाली की, डाकूच्या क्षेत्रातील आणि मानसिंहाच्या गावात एका दहा एकर जमीनीच्या तुकड्यावरून एक ब्राह्मण पुरोहित तकलीराम आणि मानसिंह यांच्यात भांडण निर्माण झाले. फौजदारी मुकदम्यात तकली रामाच्या रिपोर्टा-वरून मानसिंह आणि त्याचे इतर साथी अडकले. त्याचा परिणाम असा झाला की, त्या रागाच्या भरात मानसिंहाने तकली रामाचे घरहि जाळून टाकले.

आपापसातील संघर्ष आणि रक्तपात सुरू झाला. तकलीरामचा मुलगा माताप्रसाद आणि त्याच्या कुटुंबातील एक व्यक्ति यांना गोळी घालून ठार करण्यात आले. या गुन्ह्यामुळे मानसिंहाला पकडण्यात आले आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली. अकरा वर्षानंतर मानसिंह सुटला. पुन्हा भांडण सुरू झाले. १९४५ मानसिंहाचा मुलगा सुभेदारसिंहाने तकलीरामालाच ठार मारले. पुढील १० वर्षात मानसिंह त्या क्षेत्रातील डाकूंचा पुढारी बनला. त्याचा इतका दरारा होता की, भांडणाचे मूळ जी दहा एकर जमीन ही जशीच्या तशी पडून राहीली. त्या जमिनीकडे कोणाचेच लक्ष गेले नाही. १९४५ साली मानसिंह ठार झाल्यानंतर त्याच्या विधवा पत्नीने शेती करणे सुरू केले.

आता मानसिंहाचा नातू श्यामसिंह आणि तकलीरामाचा नातू चौबेसिंह यांच्यात पुन्हा त्या जमिनीच्या तुकड्याच्या मालकीबाबत भांडण सुरू झाले. मागील भांडणाची पुनरावृत्ति होऊ नये म्हणून सर्वोदयी कार्यकर्त्यांनी आपल्या शक्तीचा उपयोग करून दोन्ही पक्षात समझोता घडवून आणला. आता ती दहा एकर जमीन गावातील शाळेला दान करण्यात येईल आणि दोन्ही पक्ष आपापले दोष विसरतील. अशा तऱ्हेने बराच काळपर्यंत चाललेल्या या दुखःद कहाणीचा सुखद अंत झाला.

त्याच बरोबर मानवाच्या जीवनातील समस्या ह्या हिंसेने मिटत नाहीत तर प्रेमाने व सद्भावनेनेच मिटतात हे सिद्ध झाले

---

संपादक : श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक : श्री. वसंतराव बोंबटकर
मुद्रक : श्री. वामनराव पाचपांडे, नई तालीम मुद्रणालय, सेवाग्राम.
स्वामित्व : महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग : दैनिक पुरवणी ता. ५-५-६४ अं. ५० र. नं. एन्. २९५
विनोबा वार्ता, सेवाग्राम जि. वर्धा (महाराष्ट्र राज्य)
श्री. ____________________

www.vinoba.in